


# अट्टलमत

आतील पानात

**दहा दिवसात चार लाख भाविकांनी घेतलं पंढरपुरातील विठ्ठलाचं दर्शन**

RNI.no. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

वर्ष –१८, अंक–१६ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५ ते १२ जानेवारी २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने –४

# परवानगी न घेताच कामे करण्याचा सपाटा

## हिरापूर थापटीच्या सरपंचाचा मनमानी कारभार?

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पैठण तालुक्यातील हिरापूर-थापटी ग्रामपंचायतचे सरपंच विनोद राठोड यांच्या मनमानी कारभाराविरूद्ध वरिष्ठ अधिकारी कारवाई करण्याऐवजी संबंधितांना पाठीशी घालण्याचे गौडबंगाल जनतेला समजेल का?

सरपंच राठोड यांच्या मनमानी कारभाराबद्दल यापूर्वी सदरील ग्राम पंचायतच्या अनेक सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे नियमब ाह्य कामाबद्दल लेखी तक्रार देवूनही कारवाई न झाल्याने विद्यमान सरपंचांनी संबंधित विभागाकडून परवानगी न घेताच कामे करण्याचा सपाटा लावलेला आहे. हिरापूर-थापटी ग्रुप ग्रामपंचायतच्या सदस्यांना विश्वासात न घेताच यापूर्वी झालेल्या कामाची थातूर मातूर कामे करून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केलेला आहे. पूर्वी झालेलीच कामे पुन्हा पुन्हा करून स्वत:चे आर्थिक फायदे लाटत आहे. जलजीवन मिशन अंतर्गतची कामेही स्वत:च्या नातेवाईकांना देवून फायदे लाटलेले असून मासिक सभा न घेता मनमानीपणे कामे करून मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदे घेत आहे. यापूर्वी झालेल्या कामाचे अंदाजपत्रक व जमा खर्चाचा हिशोब न देण्याचा प्रकार संबंधित सरपंचांनी केले ला होता.

ग्रामपंचायतसाठी लागणारे साहित्य स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी परस्पर मालाची खरेदी करण्याचा प्रकारही यापूर्वी झालेला आहे. याबाबतही तक्रार करूनही कारवाई होत नसल्याने अनेक कामे नियमब ाह्य झालेली आहे. याची चौकशी होवून कारवाई होत नसल्यानेच सध्याही अनेक कामे नियमबाह्य होत असताना वरिष्ठ अधिकारी कारवाई का करीत नाही, अशी चर्चा संबंधित ग्रामपंचायतचे सदस्यच नव्हे तर नागरिक ही करीत आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी चौकशी करून कारवाई करतात की, सरपंचानाच पाठीशी घालतात हे लवकरच कळेल.

# महावीर घर संसार किराणा आगीच्या भक्ष्यस्थानी; लगतच्या दुकानांनाही झळ



(छायाचित्र- दिपीन राजपूत)

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

गजबजलेल्या शहागंज, चेलिपूरा येथील प्रसिद्ध महाविर किराणा शॉपीला आग लागली आहे. घटनास्थळी पोलिस दाखल झाले होते. आगीने रौद्ररूप धारण केल्याने आजूबाजूची दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. अग्निशमन दलाचे पाण्याचे बंब आग विझवण्यासाठी दाखल झाले आहेत. अजून जास्त प्रमाणात आग पसरू नये यासाठी नागरिकांनीही पुढाकार घेत आहे. रहदारीचा रस्ता बंद करण्यात आला होता.

आगीत कोट्यावधीं चे झाल्याचा अंदाज आहे. आगीचे कारण अद्याप अजून समजले नाही.आग वाढत असल्याची माहिती मिळत आहे.

आजूबाजूच्या दुकानात आग पसरली असल्याने घटनास्थळी मनपा आयुक्त जी श्रीकांत, मंत्री अतुल सावे, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी धाव घेतली आहे. अग्निशमन दलाचे पाच ते सात बंब आग आटोक्यात आणण्यासाठी आले आहे. मोठा जमाव येथे जमला आहे.

विज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. अंधारात आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. पोलिसांचा फौजफाटा वाढवण्यात आला आहे. शहागंज व चेलिपुरा परिसरातील लोक जागे झाले आहे.

## पोलिस प्रशासनाची २०२५ ची सुरुवात धडाकेबाज कारवाईने




## सिडको एमआयडीसी पोलिसांची कामगिरी, दोन आठवड्यात, तीन टप्प्यात ४० मोटारसायकल दुचाकी वाहन चोरट्याकडून हस्तगत

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगरमध्ये वेगवेगळ्या भागातून वाहन चोरीच्या घटना घडत असताना, दुसरीकडे दुचाकी वाहन चोरटयाकडून तीन टप्यात ४० मोटार सायकल दुचाकी वाहन हस्तगत करुन एक आगळा वेगळा नावलौकिक एमआयडीसी सिडको पोलिस स्टेशन अधिकारी व कर्मचारी यांच्या कामगिरीला नागरिकांनी सॅल्युट केला. त्यात हर्सुल पोलीस स्टेशनची पण कामगीरीमध्ये दुचाकी वाहन चोरटयाकडुन ६ वाहने कारवाई करून हस्तगत करण्यात आल्या. अवैध रित्या कत्तल करण्यासाठी आणलेल्या ९४ गाय ,बैल,सुटका, संयुक्त कारवाई, छावणी पोलिस अधिकारी यांनी पण ३३ गाई, वासरांची सुटका केली. एम आयडीसी वाळूज पोलीस स्टेशन यांची पण अवैध गुटखा विक्री, गाडी व गुटखा असा ९४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. वाहन चोरीच्या घटनामध्ये नक्कीच घट होणार असल्याचे पोलीस आयुक्त श्री प्रवीण पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस उपायुक्त आयपीएस श्री नितीन बगाटे यांच्या देखरेखीखाली, वेगवेगळ्या प्रकारच्या, कारवाईचा धडाका सुरू आहे, २०२५ ची सुरुवात जबरदस्त म्हणायला हरकत नाही.

# जिल्हा सामान्य रुग्णालय चिकलठाणा येथे कार्यरत असलेले जिल्हा शक्यचिकित्सक डॉ. दयानंद मोतिपवळे यांची कायदेशीर चौकशी करुन तात्काळ निलंबित करा

## झुंजार छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील कोटकर यांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

चिकलठाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे कार्यरत असलेले जिल्हा शक्यचिकित्सक डॉ. दयानंद मोतिपवळे यांचा स्वतःच्या मनमानी कारभार या ठिकाणी चालू आहे. त्या ठिकाणी कार्यरत असलेले डॉक्टर्स, नर्स, ब्रदर या सर्वांना डॉ. मोतिपवळे यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यांनी वरील नमुद सर्वांना शारिरीक व मानसिक त्रास दिल्यामुळे वरील नमुद सर्व अधिकारी व कर्मचारी वारंवार सुट्टीवर जातात या मुळे रुग्णालयात येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सर्वसामान्य रुग्णांची गैरसोय होवू नये म्हणून डॉ. दयानंद मोतिपवळे यांची कायदेशीर चौकशी करुन त्यांना तात्काळ निलंबित करावे आणि सर्वसामान्य रुग्णांना सुरळीत रुग्ण सेवा पुरवावी हि विनंती. अन्यथा झुंजार छावा संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन छेडण्यात येईल याची आपण दखल घ्यावी. असे निवेदन झुंजार छावा संघटनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले . निवेदनावर सुनील कोटकर, निलेश डव्हळे, सचिन खरात, अरूण नवले, नंदू गरड, वैभव कापसे, शेख मुजाहिद, सागर थोरात, मनोज पवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## संपादकीय

### मराठी समाजमन घडविण्यात बाळशास्त्री जांभेकरांचा बाळशास्त्री जांभेकरांचा मोठा वाटा

**दर्पण** या वृत्तपत्राद्वारे मराठी भाषेतील पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणारे, इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील एक उच्च विद्याविभूषित, पंडिती व्यक्तिमत्त्व म्हणजे बाळशास्त्री जांभेकर होत. १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात मराठी समाजमन घडविण्यात बाळशास्त्री जांभेकरांचा मोठा वाटा होता. कोकणातील राजापूर तालुक्यातील पोंभुर्ले या गावी जन्मलेल्या बाळशास्त्रींनी अनेक विषयांचे अभ्यासक-संशोधक, अध्यापक, उत्कृष्ट लेखक, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार म्हणून आपल्या कार्याचा ठसा १८३२ ते १८४६ या काळात उमटवला.

ब्रिटिशांनी भारतात येताच कोलकत्त्यामध्ये 'बेंगाल गॅझेट' नावाने इंग्रजी साप्ताहिक २९ जानेवारी १७८० रोजी सुरु केले. ब्रिटिश सरकारने आपल्या स्वार्थासाठी ठिकठिकाणी मुद्रणालये सुरु केली. समाज प्रबोधन करण्यासाठी हे महत्त्वाचे साधन आहे. त्याकरिता समाजाचे विचार परिवर्तन न होणारे वृत्तपत्र निघू नये, अशी त्यांची धारणा होती. परंतु कालांतराने आपले विचार प्रकट करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम असल्याची भारतीयांना जाणीव झाली. यानंतर अनेक भारतीय भाषांतील वृत्तपत्र निघू लागली. बंगालीनंतर मराठी असा भाषिक वृत्तपत्रांचा क्रम लागतो.

ब्रिटिशांनी भारतात आपले बस्तान सार्वजनिक केल्यानंतर पाश्चिमात्य संस्कृती मूल्यांचा भारतातील पारंपरिक जुन्या मूल्यांशी संघर्ष निर्माण झाला. तथापि, पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयामुळे भारतीय पंडितांना समाजातल्या घडामोडींची भौतिक दृष्टीने कारणमीमांसा करण्यास प्रोत्साहनही मिळाले. समाजातील वर्ण व्यवस्था, जातीभेद, स्त्री दास्य, सती प्रथा, अस्पृश्यता, बालविवाह आदी जुन्या मूल्यांचा पुनर्विचार करण्यास पंडितांना भाग पाडले. यातूनच एकसंध समाज निर्माण करण्यासाठी समाजातील भेदाभेद गेले पाहिजेत, याची त्यांना जाणीव झाली. हळूहळू समाज प्रबोधनाची प्रक्रिया सुरु झाली. यातच वृत्तपत्रांचे आगमन ही घटना क्रांतीकारक ठरली.

ब्रिटीश सरकारच्या अधिपत्याखाली असलेल्या कलकत्ता, मद्रास (चेन्नई), मुंबई येथे इंग्रजी वृत्तपत्रांची सुरुवात झाली. परंतु जनतेच्या अस्तित्वाला या वृत्तपत्रात विशेष स्थान देण्यात येत नसे. या वृत्तपत्रांवर सरकारचे विशेष लक्ष होते. जहाजांची ये-जा, जाणाऱ्या-येणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावे, सरकारी जाहिराती आदी मजकूर वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात येत असे. यामुळे भारतीय सुशिक्षित वर्गात वृत्तपत्र ही कल्पना रुजू लागली. इंग्रजी भाषेत वृत्तपत्रे निघतात तर भारतीय भाषांतही अशी वृत्तपत्रे का निघू नयेत, असा प्रश्न निर्माण झाला.

कोलकत्ता येथे पहिले इंग्रजी वृत्तपत्र निघाल्यामुळे या शहरात पहिल्या भाषिक वृत्तपत्राचाही प्रारंभ झाला. भारतीय समाजाने नवीन वैचारिक जागृती आणि नवी जाणीव निर्माण होण्यास या वृत्तपत्रामुळे मदत झाली. जेम्स ऑगस्टस हिकीच्या इंग्रजी 'बेंगॉल गॅझेट'च्या आगमनानंतर तब्बल अर्ध्या दशकाने म्हणजेच ५२ वर्षांनी ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर या विद्वानानं 'दर्पण' च्या रुपाने पहिले मराठी वृत्तपत्र सुरु केले. मुंबईत जांभेकरांनी 'दर्पण'च्या माध्यमातून सुरु केलेली वैचारिक प्रबोधनाची पेरणी मराठी भूमीत रुजण्यास सुरुवात झाली.

एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या जांभेकरांना आपण दर्पणकार म्हणूनच ओळखतो. ब्रिटिश कालखंडात त्यांनी दर्पणच्या संपादनाची धुरा समर्थपणे वाहिली. भविष्यकाळातील माध्यमाची जबरदस्त ताकद त्यांनी तेव्हाच ओळखली होती. परकीय सत्तेला उलथून टाकायचे असेल तर समाजजागृती घडवायला हवी आणि त्यासाठी लेखणीला पर्याय नाही, हे त्यांना फ़ार पूर्वीच समजले होते. बाळशास्त्री हे कडवे देशाभिमानी होते. त्यांच्या या देशसेवा आणि समाजसेवेच्या जाणिवेतूनच दर्पणसारख्या नियतकालिकाचा जन्म झाला. मराठी वृत्तपत्रविश्वात नवी पहाट उगवली. दर्पणचा जन्म होताना गोविंद कुंटे व भाऊ महाजन यांचेही सहकार्य बाळशास्त्रींना लाभले. त्यावेळी बाळशास्त्रींचे वय अवघे वीस वर्षांचे होते. एका वृत्तपत्राच्या संपादकाला आवश्यक असणारी भाषेची जाण आणि सामाजिकतेचे भान त्यांच्याकडे होते. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. इंग्रजी आणि मराठी अशा जोड भाषेत प्रकाशित होणारे हे वृत्तपत्र! या अंकात दोन स्तंभ असत. उभ्या मजकुरात एक स्तंभ (कॉलम) मराठीत आणि एक स्तंभ इंग्रजीत असे. मराठी मजकूर अर्थातच सर्वसामान्य जनतेसाठी होता आणि इंग्रजी मजकूर हा वृत्तपत्रात काय लिहिले आहे, हे राज्यकर्त्यांनाही कळावे यासाठी होता. वृत्तपत्राची संकल्पना त्याकाळी लोकांना नवीन होती. त्यामुळे दर्पणचे वर्गणीदार सुरुवातीच्या काळात खूप कमी होते. पण हळूहळू लोकांमध्ये ही संकल्पना जशी रुजली, तसे त्यातील विचारही रुजले आणि प्रतिसाद वाढत गेला. दर्पणवर प्रथमपासूनच बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. दर्पण अशा रितीने साडेआठ वर्षे चालले आणि जुलै १८४० ला त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. आचार्य जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. दर्पण हे बाळशास्त्रींच्या हातातील एक लोक शिक्षणाचे माध्यम होते. त्यांनी त्याचा उत्तम वापर प्रबोधनासाठी करून घेतला.

# गुरु गोविंद सिंगजी यांच्या अतुलनीय योगदानामुळे केवळ शीख धर्मच नव्हे तर भारताच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जडणघडणीलाही आकार दिला गेला

**१० व्या** शीख गुरूंचे जीवन, शिकवणी आणि कालातीत वारसा यावर मनापासून विचार करून गुरु गोविंद सिंग जयंती २०२५ साजरी करा. त्यांची जयंती, त्याचे महत्त्व आणि त्यांच्या दृष्टीने शीख समुदायाला कसा आकार दिला याबद्दल जाणून घ्या. २०२५ मध्ये आपण पाऊल ठेवत असताना, गुरु गोविंद सिंग जयंती साजरी केल्याने लाखो शीख आणि जगभरातील त्यांच्या उल्लेखनीय वारशाचे प्रशंसक पुन्हा एकत्र येतात. हा शुभ प्रसंग म्हणजे शीख धर्माचे आदरणीय १० वे गुरू, गुरु गोविंद सिंग जी यांच्या जयंतीनिमित्त, ज्यांच्या अतुलनीय योगदानामुळे केवळ शीख धर्मच नव्हे तर भारताच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जडणघडणीलाही आकार दिला गेला.

२२ डिसेंबर १६६६ रोजी पाटणा साहिब (आधुनिक बिहार, भारत) येथे जन्मलेले गुरू गोविंद सिंग जी त्यांचे वडील गुरू तेग बहादूर जी यांच्या हौतात्म्यानंतर वयाच्या नऊव्या वर्षी शीख समुदायाच्या नेतृत्वावर आरूढ झाले.

तथापि, त्यांची जयंती नानकशाही दिनदर्शिकेनुसार पोह (पौष) महिन्यात शुक्ल पक्षातील सप्तमी तिथीला साजरी केली जाते. परिणामी, ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये प्रत्येक वर्षी तारीख बदलते. दडपशाही आणि अत्याचाराने चिन्हांकित केलेल्या त्यांच्या काळातील प्रचंड आव्हाने असूनही, गुरु गोविंद सिंग जी धैर्य, शहाणपण आणि अध्यात्माचे दिवाण म्हणून उदयास आले. १६९९ मध्ये खालसा पंथची स्थापना केल्याबद्दल, समता, न्याय आणि निः स्वार्थतेसाठी समर्पित बंधुता म्हणून त्यांचा गौरव केला जातो.

हा दिवस केवळ त्याच्या शिकवणुकींचे प्रतिबिंबच नाही तर आत्मपरीक्षण आणि त्यांनी स्वीकारलेल्या मूल्यांचे पुनर्समर्पण करण्याचाही वेळ आहे - निर्भयता, करुणा आणि अटल विश्वास.

गुरू गोविंद सिंग जयंती ६ जानेवारी २०२५ रोजी साजरी करण्यात आली. हा शुभ दिवस प्रार्थना, कीर्तन आणि त्यांच्या जीवनाचा आणि वारशाचा सन्मान करणाऱ्या शिकवणींनी साजरा केला जातो. समता, धैर्य आणि मानवतेच्या भक्तीची त्याची अटल वचनबद्धता साजरी करण्यासाठी जगभरातील शीख समुदाय एकत्र येतात. गुरु गोविंद सिंग जी हे एक आध्यात्मिक द्रष्टे होते ज्यांच्या शिकवणींनी देवाची एकता, धार्मिक जीवनाचे महत्त्व आणि सर्व मानवजातीच्या समानतेवर जोर दिला. १६९९ मध्ये खालसा पंथची स्थापना करून, त्यांनी शीख धर्मात निःस्वार्थीपणा, निर्भयता आणि सर्वशक्तिमान भक्तीच्या आदर्शांचा समावेश केला. त्यांच्या जीवनाने 'संत-सिपाही' (संत-सैनिक) या संकल्पनेचे उदाहरण दिले, ज्याने व्यक्तींना अध्यात्म आणि समाजाप्रती जबाबदारी यांच्यात संतुलित जीवन जगण्यास प्रोत्साहित केले.



धार्मिक स्वातंत्र्याचे रक्षक

गुरू गोविंद सिंग जी यांचे जीवन धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणाचा दाखला होता. ते अत्याचार आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहिले, त्यांनी केवळ शीख समुदायाचेच नव्हे तर सर्व धर्मातील व्यक्तींच्या धर्माचे निर्भयपणे पाल त्याच्या शिकवणी आणि कृती एकता, सहिष्णुता आणि विविधतेच्या आदराचे महत्त्व अधोरेखित करतात - आजच्या जगात खोलवर प्रतिध्वनी करणारी मूल्ये.

**त्याच्या शिकवणी आणि लेखनातून प्रेरणा -** गुरु गोविंद सिंग हे केवळ योद्धाच नव्हते तर एक विद्वान आणि कवी देखील होते. त्यांनी शीख साहित्यात, दसम ग्रंथासारख्या ग्रंथांची रचना करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. आपल्या लेखनातून, त्यांनी गहन आध्यात्मिक अंतर्दृष्टी, धैर्याचे सार आणि निःस्वार्थ सेवेचे महत्त्व सांगितले. शेवटी, गुरु गोविंद सिंग जयंती ही एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणार्थापेक्षा अधिक आहे - हा कालातीत मूल्यांचा उत्सव आहे जो जगभरातील लोकांना प्रेरणा देत आहे. हे गुरु गोविंद सिंग जी यांच्या गहन वारशावर चिंतन करण्याची आणि एखाद्याच्या दैनंदिन जीवनात धैर्य, करुणा आणि अतूट विश्वासाची तत्त्वे आत्मसात करण्याची संधी म्हणून काम करते.

# बाळशास्त्री जांभेकरांनी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली

**मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी ज्यांनी मोलाचे कार्य केले. त्या दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचे स्मरणपर्व या हेतुने ६ जानेवारी हा दिवस पत्रकार तथा पत्रकारिता दिन म्हणून महाराष्ट्र भर साजरा केला जातो. नवीन जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवून त्यांनी या परंपरेचा पाया घातला. त्या निमित्ताने हा विशेष लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या त्रोटक शब्दांत... संपादक.**



कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यातील पोंभुर्ले या गावी दि.६ जानेवारी १८१२ रोजी बाळशास्त्रींचा जन्म एका पुराणिकाच्या घरी झाला. अज्ञान, दारिद्र्य आणि रुढीप्रिय समाजाच्या अंधःकारातून बाहेर पडण्यासाठी ते मुंबईत आले. तेथे बापू छत्रे यांच्या निवासस्थानी राहून त्यांनी अध्ययन सुरू केले. आपल्या विलक्षण बुद्धिचातुर्याने व तल्लख स्मरण शक्तीने त्यांनी त्या वेळच्या सार्वजनिक जीवनावर विलक्षण छाप टाकली. सन १८३०मध्ये हिंद शाळा पुस्तक मंडळाचे सेक्रेटरी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आणि एक नवे क्षितिज त्यांच्यासाठी खुले झाले. त्यांनी आता ग्रंथरचनेस प्रारंभ केला. त्यानंतर वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी जन्मदिनी दि.६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या पत्राची मुहूर्तमेढ रोवली. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात केले. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे नवयुग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी! ती महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवविचारांची लाट निर्माण करण्यासाठी केली. प्रयत्नशील व वैचारिक चळवळ सुरू केली. त्यांनी समाज सुधारणा व शिक्षणाची अभिवृद्धी हेच आपले जीवनकार्य मानले.

मराठी पत्रकारितेचा पाया श्रेष्ठ दर्जाच्या संपादकाने- आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी घातला. त्यांनी अल्पावधित महाराष्ट्राच्या जीवनावर विलक्षण छाप टाकली. त्यांनी राष्ट्रीय विकासासाठी पोषक अशा बहुविध क्षितिजाचा विकास केला. त्यामुळे त्यांना पश्चिम भारतामधील प्रबोधनाचे प्रवर्तक म्हटले जाते. मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी त्यांनी बजावलेले कार्य हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदविण्यासारखे आहे. त्यामुळे परंपरेचा सुवर्णप्रवाह विकसित झाला. प्रथम श्रेणीचे आद्य वृत्तपत्र म्हणून 'दर्पण' वृत्तपत्राची कामगिरी लक्षणीय अशी ठरली आहे. दर्पण हे वृत्तपत्र सन १८३२मध्ये काढून मराठी वृत्तपत्रव्यवसायाचा त्यांनी पाया घातला. त्यांनीच सन १८४०मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. त्यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू, या उपक्रमांमागे होता.



\- संकलन व शब्दांकन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(एक प्राणी-पक्षी प्रेमी.)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करुन नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाव्दारे रुजविली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालामध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे नवयुग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. मराठी पत्रकारितेच्या विचार विश्वात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांसारखी विलक्षण कामगिरी बजावणारे ते त्यामुळे युगप्रवर्तक पत्रकार ठरले. सन १८३४मध्ये भारतातील पहिले प्राध्यापक- प्रोफ़ेसर होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. एलफिन्स्टन निधीतून त्यांच्यासाठी स्वतंत्र अध्यासन निर्माण करण्यात आले. सन १८४५मध्ये राज्यातील शिक्षण विभागाचे संचालक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. प्राध्यापक या नात्याने अध्ययन, अध्यापन संशोधन व विस्तार ही कार्ये पार पाडण्यात त्यांनी धन्यता मानली. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवविचारांची लाट निर्माण करण्यासाठी वैचारिक चळवळ सुरु केली. समाज सुधारणा व शिक्षणाची अभिवृद्धी तेच त्यांनी आपले जीवनकार्य मानले. प्राध्यापक या नात्याने केवळ अध्यापन व संशोधनात ते व्यग्र होते, असे नाही तर त्यांनी राष्ट्रीय जीवनात अनेक प्रागतिक चळवळींना गती दिली. सामाजिक प्रबोधनात वृत्तपत्रासारखे दुसरे साधन नाही, हे ओळखून त्यांनी बंगाली वृत्तपत्रांपासून प्रेरणा घेतली. राजाराम मोहन रॉय यांचे कार्य आणि बंगाली पत्रांनी केलेला झंझावाती प्रचार यामुळे ते प्रभावित झाले. त्यांनी नव्या पत्राचा संकल्प करून तो कृतीत आणला. ध्येयवादी बंगाली पत्राचा वस्तुपाठ त्यांनी गिरविला आणि त्यातून महाराष्ट्रात नवीन लोकचळवळ उभारली. गंगा-यमुना द्वैभाषिक

पान ३ वर

पान २ वरून

## बाळशास्त्री जांभेकरांनी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली

पत्र ही परंपरा बंगालतून महाराष्ट्रात पुढे आली. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या समग्र जीवनाकडे पाहिले असता त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विलोभनीय दर्शन घडते. त्यांना देशी व विदेशी ९ भाषा अवगत होत्या. मराठी, इंग्रजी, संस्कृत, बंगाली, कन्नड इत्यादीप्रमाणे त्यांनी विदेशी भाषांचाही अभ्यास केला होता. त्यांच्या अभ्यासविषयात भाषाशास्त्रे, इतिहास व संस्कृती, गणित, पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, पुरातत्वविद्या इत्यादींचा समावेश होता. या सर्व विषयात त्यांनी मराठी भाषेत ग्रंथरचनाही केली. त्यांच्या कार्याबद्दल तत्कालीन वृत्तपत्रांमध्ये प्रामुख्याने बॉम्बे टाईम्स, कुरियर, ज्ञानोदय, ओरिएंटल स्पेक्टेटर इत्यादी पत्रांनी वारंवार प्रशंसा केलेली आढळते व त्यांच्या समाजकार्याची नोंदही घेतलेली दिसते. तत्कालीन शाळा खात्याने त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. मुंबई न्यायालयाचे त्यावेळचे न्या.सर टी. ई.पैरी यांनी त्यांचा गौरव केला होता. रे.डॉ.विल्सन व न्या.चंदावरकर या तत्कालीन विद्वानांनी त्यांच्या लोकाभिमुख विद्वत्तेचा गौरव केला होता. आज बऱ्याच ठिकाणी पत्रकार बांधवाच्या वतीने उत्कृष्ट साहित्यिक, लेखक, कवी, समाजसेवक आदींना दर्पणकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येऊ लागले आहे. समाजानेही पत्रकार बांधव वृत्तसंकलनरुपात करीत असलेली अविरत- अहर्निश सेवा व न्यायदानाची धडपड लक्षात घेऊन यथोचित त्यांचाही दर्पणकार पुरस्काराने गौरव केला पाहिजे, असे जाहीरपणे सुचवावेसे वाटते. भारतीय राष्ट्रवादाचे पितामह दादाभाई नौरोजी हे जांभेकरांचे विद्यार्थी होते. त्यांनी गुरुबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले आहे, की ते पश्चिम भारत खंडातील अर्वाचीन विद्वान मुकुटमणी, प्रख्यात पं.अद्वितीय विद्वान होते. मुंबईना समाचार या गुजराथी पत्राने या शिक्षण महर्षींची स्मृती भारतीयांनी सतत जागृत ठेवावी, असे आवाहनही केले होते. दि.१७ मे १८४६ रोजी जांभेकरांचा आकस्मिक मृत्यू झाला. पण अल्पावधित त्यांनी बजावलेले कार्य महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा कायापालट करणारे ठरले, हेच खरे! !! अशा या थोर आद्य पत्रकारास लाख लाख विनम्र अभिवादन !!

# जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे रक्तदान महायज्ञाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अतुल मत प्रतिनिधी)**

जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज संस्थांना तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महा रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. सदरील शिबिर हे संपूर्ण महाराष्ट्रा बरोबर देशातील विविध राज्यांमध्ये होणार आहे.

त्यात एक भाग म्हणून आपल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये दिनांक ४ जानेवारी ते १९ जानेवारी या दरम्यान जवळपास ८० ते ८५ कॅम्पचे नियोजन करण्यात आलेले आहे. जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज संस्थानचे विविध समाज उपयोगी उपक्रम नेहमीच सुरू असतात. त्यामध्ये बिन (ब्लड इन नीड) ही एक सेवा मागच्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. या सेवेच्या माध्यमातून गरजू व्यक्तींना रक्तदाता उपलब्ध करून देण्याचे कार्य हि सेवा करत असते. त्यासाठी खाली दिलेल्या नंबर वर ( ९६१९९१७१००४) कॉल करावा ( सदरील सेवा ही २४द७ , सुरू आहे. ) याच सेवेचा भाग म्हणून वरील रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

आपल्या महाराष्ट्रामध्ये सिकलसेल, अनेमिया, हिमोफिलिया, थैलेसिमिया, ब्लड कॅन्सर आणि किडनी फेल्युअर पेशंट जास्त आढळतात. अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते. जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान ही गरज लक्षात घेऊन जमा होणाऱ्या रक्त बाटल्या महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढ्यांना उपलब्ध देणार आहेत. आपल्या दैनंदिन जीवनातील फक्त पाच मिनिटे रक्तदानासाठी आवश्यक आहेत. रक्तदात्यासाठी ते फक्त एक दान आहे पण गरजवंतासाठी हे जीवनदान आहे. स्वतः बरोबर आपल्या मित्र व नातेवाईकांस या महान रक्तदान कार्यासाठी प्रवृत्त करा व रक्तदान करण्यासाठी त्यांना घेऊन या असे आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्हा सेवा समितीतर्फे करण्यात येत आहे.

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे

ब्लड इन नीड ही एक सेवा म ागच्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. या सेवेच्या माध्यमातून गरीब व गरजू व्यक्तींना रक्तदाता उपलब्ध करून देण्याचे कार्य हि सेवा करत असते. त्यासाठी खाली दिलेल्या नंबर वर ( ९६१९९१७१००४) कॉल करावा सदरील सेवा ही २४द७ , सुरू आहे.

याच सेवेचा भाग म्हणून वरील रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आलेले आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये सिकलसेल,अनेमिया, हिमोफिलिया, थैलेसिमिया, ब्लड कॅन्सर आणि किडनी फेल्युअर पेशंट जास्त आढळतात. अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते.जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान ही गरज लक्षात घेऊन जमा होणाऱ्या रक्त बाटल्या महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढ्यांना उपलब्ध देणार आहेत. आपल्या दैनंदिन जीवनातील फक्त पाच मिनिटे रक्तदानासाठी आवश्यक आहेत. रक्तदात्यासाठी ते फक्त एक दान आहे पण गरजवंतासाठी हे जीवनदान आहे. सदरील कॅम्प यशस्वी करण्यासाठी जिल्हा सेवा समिती तसेच छ.संभाजीनगर शहरातील पूर्व पश्चिम आणि मध्य तालुका सेवा समिती,संग्राम सेना युवासेना महिला सेना यांनी परिश्रम घेतले.



मा.अतुल सावे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास व अपारंपारिक ऊर्जा विभाग मंत्री यांनी महा रक्तदान शिबिरास भेट दिली. रक्तदानाचे महत्त पटवून दिले. तसेच अभिनंदन केले.

## माणुसकी अजूनही जिवंत

# पोलीस कॉन्स्टेबल वैभव सपकाळ यांनी वाचवले महिलेचे प्राण



**छत्रपती संभाजीनगर (अतुल मत प्रतिनिधी)**

पोका./४६५ वैभव रवींद्र सपकाळे लोहमार्ग पोलिस ठाणे छत्रपती संभाजीनगर हे २५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी आपल्या कर्तव्यावर येत असताना सुलक्षणा प्रभाकर नाईक (वय ५०) कांचननगर पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे राहणारी ही महिला रेल्वे पुलाकडे येताना दिसला. अगोदर मी तिच्याकडे फक्त पाहिले मला तिच्या मनात काय म्हणून कळाले नाही परंतु ज्यावेळेस मी दुसरीकडून जलदगतीने येणारी रेल्वे पाहिले तेव्हा तिने उडी मारण्यासाठी सज्ज झालेल्या अवस्थेत दिसली.

मला लगेच क्लिक झाले की, या महिलेचा विचार आत्महत्येचाच असावा म्हणून मी लगेच क्षणाचा ही विचार न करता प्रसंगावधान राखून सुलक्षणा नाईक यांना आत्महत्या करण्यापासून यशस्वीपणे रोखले असे पोलिस कॉन्स्टेबल वैभव सपकाळे यांनी सांगितले. महिलेला विचारपूस करत असताना मला कळाले की, ती कौटुंबिक नैराश्यात तसेच तणावाखाली आहे. यावर तिचे आत्महत्येचे मत परावर्तीत करून जगण्याचे महत्त्व सांगत तेथून बाहेर काढले. सुलक्षणा नाईक यांची विचारपूस करून तिच्याकडून माहिती घेत तिच्या सोबत जावून महिलेचे वडील प्रभाकर नाईक यांच्या ताब्यात सुखरूप दिले. तसेच त्यांची काळजी घेण्याचे सांगितले काही अडचण आल्यास संपर्क करण्याचे आश्वासन ही वैभव सपकाळे यांनी सांगितले.

# रा.से.यो.हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे साधन- रवींद्र जोगदंड

## देवगिरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिर मौजे खिर्डी येथे

**छत्रपती संभाजीनगर (अतुल मत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि म.शि. प्र. मंडळ संचलित देवगिरी महाविद्यालय (स्वायत्त) छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे खिर्डी ता.खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर याठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिराचे आयोजन केले आहे. हे शिबिर हे दि. ३१ डिसेंबर २०२४ ते ०६ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये संपन्न झाली आहे. या शिबिराचे उद्घाटन देवगिरी महाविद्यालयाचे जेष्ठ सदस्य मा. पंडितराव हर्षे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यात्रसंगी बोलताना ते म्हणाले की,राष्ट्रीय सेवा योजना हा शासनाचा अतिशय चांगला उपक्रम असून शासन देत असलेल्या निधीचा योग्य वापर होणे गरजेचे आहे. आपल्या म हाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी चांगली मेहनत घेऊन गावातील विविध प्रकारच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत असा मानस त्यांनी यात्रसंगी व्यक्त केला.


कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून छत्रपती संभाजीनगरचे म.न.पा. उपायुक्त मा. श्री रवींद्र जोगदंड हे उपस्थित होते. यात्रसंगी रवींद्र जोगदंड म्हणाले की, देवगिरी म हाविद्यालय व म.न.पा. छत्रपती संभाजीनगर यांनी संयुक्त पणे विविध समाजोपयोगी उपक्रम यापूर्वी राबविले आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम हा विद्यार्थी आणि ग्रामीण भाग यांना जोडणारा दुआ आहे.

राष्ट्रीय सेवा योजना हा शासनाचा असा उपक्रम आहे ज्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास साधला जावू शकतो. युवकांनी ठरवले तर ते कोणत्याही क्षेत्रात क्रांती घडवू शकतात. मेहनतीच्या बळावर सामान्य व्यक्ती ही असामान्य कर्तृत्व बजावू शकतो हे त्यांनी विविध खेळाडू व वैज्ञानिक यांची उदाहरणे देऊन पटवून दिले. खिर्डी गावाचे सरपंच मा. ज्ञानेश्वर मातकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील त्यांचे स्वानुभव सांगत स्वयंसेवकांमध्ये उत्साह निर्माण केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एक महत्त्वाचे व्यासपीठ असून विद्यार्थ्यांचे चारित्र्य संवर्धन करण्याचे एक माध्यम असल्याचे त्यांनी सुतोवाच केले.

यात्रसंगी रा.से. योजनेचे जिल्हा सम न्वयक मा. ज्ञानेश्वर पाथ्रीकर यांनी त्यांचे शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. अशोक तेजनकर हे होते. अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात सहभागी होणारे विद्यार्थ्यांचे भविष्य हे उज्वल असतं, कारण हे विद्यार्थी मेहनती असतात व कोणत्याही परिस्थितीत यश प्राप्त करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विकसित करत असते. पुढे बोलताना प्राचार्य असे म्हणाले की, महानगरपालिका व छत्रपती संभाजीनगरम धील काही महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन शहरातील व आसपासच्या खेडे गावात जाऊन तेथील घन कचरा व्यवस्थापन करण्याविषयी व व्यसनमुक्ती संबंधी सर्वेक्षण केले पाहिजे. तसेच बालविवाह व प्रौढविवाह ह्या ज्या समस्या सद्यकालीन स्थितीमध्ये आहेत त्या बाबतीत ही जनजागृती होणे गरजेचे आहे. शहरी भागात लवकर लग्न करत नाहीत व ग्रामीण भागात बालविवाह करतात, ह्या दोन्ही गोष्टी चूकीच्या आहेत तसेच यांचे विविध दुष्परिणाम आहेत. ह्या समस्या निवारण करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. या शिबिरात आपण रचनात्मक कार्य करुन या ठिकाणावरुन निश्चितपणे चांगल्या आठवणी घेऊन जाव्यात व यशस्वी जीवनाकडे वाटचाल करावी. या शिबिरात राबविण्यात येणाऱ्या बालविवाह प्रतिबंध, मतदान जनजागृती, जल व्यवस्थापन, अन्न सुरक्षा, पर्यावरण विकास आदी उपक्रम समाजासाठी, गावातील लोकांसाठी निश्चित लाभदायक ठरतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे, सरपंच श्री ज्ञानेश्वर मातकर, ग्रामपंचायत सदस्य पांडव, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उत्तम वरकड, ग्रामसेवक श्रीमती जयश्री पुलकंटवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराच्या आयोजनासाठी उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. विष्णू पाटील, यांनी सहकार्य केले. रा. से. योजनेचे महाविद्यालयीन सम न्वयक व कार्यक्रमाधिकारी डॉ.अनंत कनगरे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर स्वयंसेवक वैभवी तवार व लक्ष्मण जाधव यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले. यात्रसंगी खिर्डी गावातील प्रतिष्ठित नागरिक, युवक, रा.से. यो.चे सल्लागार समितीच्या डॉ. रंजना चावडा, कार्यक्रमाधिकारी डॉ. भाऊसाहेब शिंदे, महिला कार्यक्रमाधिकारी प्रा. सुवर्णा पाटील व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक आदींनी प्रयत्न केले.



पोलिस स्थापना दिनानिमित्त गंगापूर पोलिस स्टेशनमध्ये आरोग्य तपासणी शिबिर व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी व माहितीसाठी आटो रिक्षामध्ये रिक्षा व मोबाईल नंबरचे माहिती पत्रक ग्रामीण पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या हस्ते लावण्यात आले.

# सेंट्रल बसस्थानकामध्ये मोबाईल चोराला पकडून केले पोलीसांच्या स्वाधीन





चोराची झाडाझडती घेवून प्रदिप सोनवणे या विद्यार्थ्यांचा मोबाईल त्याला परत देण्यात आला.

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मध्यवर्ती बसस्थानक सेंट्रल बसस्थानक येथे आजोबांना बसमध्ये सोडण्यासाठी आलेला विवेकानंद कॉलेजला शिकणाऱ्या प्रदिप सोनवणे या विद्यार्थ्यांचा मोबाईल बसमध्ये चढतांना, अलगदपणे मोबाईल चोराने काढून घेतला. असता नागरिकांनी मोबाईल चोरी करणाऱ्या एकास पकडले त्याचा दुसरा साथीदार हा पळून गेला. ०५/०१/२५ वार रविवार रोजी ४ वाजे दरम्यान ही घटना घडली.

जो साथीदार हा पळून गेला त्याचा पण पाठलाग नागरिकांनी केला होता. बसस्थानक पोलीस चौकीमध्ये पोलीस अंमलदार श्री श्रीहरी जाधव, व संतोष सुर्यवंशी, शेख अर्शद यांनी त्याची झाडाझडती घेतली असता त्याच्याकडे मोबाईल मिळुन आला, पुढील कारवाईसाठी मोबाईल चोराला क्रांती चौक पोलिस स्टेशनला नेण्यात आले,' प्रदिप सोनवणे या विद्यार्थ्यांचा मोबाईल त्याला परत देण्यात आला.

'प्रवाशांना आवाहन, बसमधे चढतांना, लोटालाटी, ढकला, ढकली करुन, लक्ष विचलित करुण मौल्यवान वस्तुंची चोरी होण्याचे प्रकार घडत असल्याने प्रवास करतांना आपल्या मौल्यवान वस्तूची काळजी घ्यावी, महिला व पुरूष, चोरांची टोळीच असते. त्यामुळे प्रवाशांनी काळजी घ्यावी, संर्शईत व्यक्ती आढळून आल्यास जवळच्या पोलिस चौकीत संपर्क साधावा, किंवा, डायल ११२ वर कॉल करुन माहिती द्यावी.

# भारतातील पहिला ए, एचएमपीव्ही रुग्ण बंगळुरूत

**बंगळुरू :** कर्नाटकची राजधानी बंगळुरू येथून एक चिंताजनक बातमी आली आहे. भारतातील पहिला ह्युमन मेटान्युमोव्हायरस बाधीत रुग्ण बंगळुरूत आढळला आहे. तापामुळे आठ महिन्यांच्या मुलाला बाप्टिस्ट रुग्णालयात दाखल केले आहे. खासगी लॅबमध्ये नमुने तपासल्यानंतर मुलाला ह्युमन मेटान्युमोव्हायरसची बाधा झाल्याचे लक्षात आहे. सरकारी प्रयोगशाळेने नमुने तपासलेले नाहीत. रुग्णावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी राज्याचा आरोग्य विभाग आणखी माहिती घेत आहे. मुलाला ज्या विषाणूची बाधा झाली आहे तो चीनमध्ये आढळलेला ह्युमन म ेटान्युमोव्हायरसच आहे का याची माहिती अद्याप कर्नाटक सरकारने दिलेली नाही. मानवी मेटाप्युमोव्हायरसची कमी – जास्त प्रमाणात बाधा झाल्यामुळे इन्फ्लूएंझा ए, एचएम पीव्ही, मायकोप्लाझ्मा न्यूमोनिया, कोविड-१९ असे वेगवेगळे संसर्गजन्य आजार पसरण्याचा धोका असतो.

सध्या मानवी मेटाप्युमोव्हायरसला आळा घालण्यासाठी लस अस्तित्वात नाही. तसेच मानवी मेटाप्युमोव्हायरसची बाधा झाल्यास बरे करण्यासाठी एकही ठोस औषध उपलब्ध नाही. रुग्णाला मानवी मेटाप्युमोव्हायरसची बाधा झाली तर सुरुवातीला सर्दी – खोकला, ताप अशी सामान्य लक्षणे दिसतात आणि हळू हळू परिस्थिती बिघडते. पण या संकटावर मात करण्यासाठी उपाय सापडलेला नाही.

# संघटनेने समाजासाठी काम करावे- किरण चव्हाण






**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेचा राज्यस्तरीय पदाधिकारी मेळावा व सत्कार सोहळा पार पडला. रविवारी (ता. ५) बजाजनगर येथील जागृत हनुमान मंदिराजवळील हॉलमध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी समाजाला एकत्रित घेऊन करून संघटना वाढवावी तसेच संघटनेने समाजासाठी काम करावे, असे आवाहन सेनेचे संस्थापक अध्यक्ष किरण चव्हाण यांनी केले.

मेळाव्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यातील पदाधिकारी आले होते. सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा परिचय आणि सत्कार कार्यक्रमात करण्यात आला. तसेच, नूतन दाधिकाऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी किरण चव्हाण यांनी संघटनेची आगामी काळातील कार्यक्रमाची धोरणे आणि रूपरेषा स्पष्ट केली. कार्यक्रमाला नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुकेश राठोड, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रमेश चव्हाण, प्रदेश महिला अध्यक्ष आशा राठोड, प्रदेश कार्याध्यक्ष सचिन राठोड, अजय चव्हाण, कैलास पवार, सीताराम राठोड, मराठवाडा अध्यक्ष राम राठोड, विलास राठोड आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन जिल्ह्यातील पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष लहू राठोड, रामेश्वर राठोड, ज्योती राठोड, तेजस राठोड, अविनाश पवार, मनीषा राठोड, प्रसिद्धिप्रमुख योगेश जाधव यांच्यासह इतरांनी पुढाकार घेतला.

# दहा दिवसात चार लाख भाविकांनी घेतलं पंढरपुरातील विठ्ठलाचं दर्शन

सोलापूर : नववर्षाचे स्वागत अनब धार्मिक पर्यटनाच्या निमित्ताने आलेल्या ३ लाख ८२ हजार १३७ भाविकांनी पंढरपुरातील विठ्ठलाचं दर्शन घेतल्याची माहिती मंदिर समितीने शनिवारी सकाळी पत्रकारांना दिली. या दहा दिवसाच्या काळात मंदिर समितीला २ कोटी ४१ लाख ५९ हजार २८७ रुपयांचे उत्पन्न मिळाल्याचेही मंदिर समितीने सांगितले. दरम्यान, एक दिवसाची ट्रिप करण्याचे फॅड वाढले आहे. त्यामुळे बहुतांश लोक सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर व गाणगापूर याठिकाणच्या धार्मिक स्थळांना भेटी देतात.

यंदा सलग सुट्ट्या अनब नववर्षानिमित्त पर्यटनासाठी हजारो लोकांनी सोलापूरला पसंती दिली.पंढरपुरातील विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह अन्य राज्यातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या गर्दीमुळे पंढरपुरातील वाहतूकीवर मोठा ताण दिसून आला. हॉटेल, लॉजेस, कॉटैज व मठांमध्ये मोठी गर्दी दिसून आली. नववर्षाच्या निमित्तानं पंढरपुरातील विठ्ठल मंदिराला आकर्षक सजावट केल्यामुळे मंदिराचं सौदर्य खुलले होते. पंढरपुरबरोबरच सोलापुरातील सिध्देश्वर मंदिर, अक्कलकोटमध्ये स्वामी समर्थ मंदिर, गाणगापूर येथील दत्त मंदिर व तुळजापूर येथील तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी मागील दहा ते बारा दिवसात मोठमोठया रांगा लागल्याचेही दिसून आले.

# एकही उद्योग महाराष्ट्रातून बाहेर जाणार नाही! उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे :** मागील सरकारच्या अडीच वर्षातील पहिल्याच सहा महिन्यात महाराष्ट्र ाला उद्योगात एक नंबरला आणला. त्याआधीच्या लॉकडाऊन सरकारमुळे काही उद्योग राज्याबाहेर गेले. मात्र,यापुढे एकही उद्योग महाराष्ट्रातून जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. यासंदर्भात संबंधित मंत्र्यांनी दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. ठाण्यात सुरू असलेल्या लक्षवेधच्या दोन दिवसीय 'बिझनेस जत्रा'चा समारोप एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला.

त्यावेळी उपस्थित उद्योजकांना संबोधित करताना ते बोलत होते.३ ते ४ जानेवारी या कालावधीमध्ये आयोजित लक्षवेधच्या चौथ्या बिजनेस जत्रेमध्ये लघुउद्योजक तसेच व्यावसायिकांचे १५० च्या आसपास स्टॉल लागले होते. दोन दिवसात ९ हजार जणांनी भेट दिल्याची माहिती आयोजक अतुल राजोळी, गणेश दरेकर यांनी सांगितले. या बिझनेस जत्रेच्या समारोप दिनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देऊन लघु उद्योजकांना उद्बोधक मार्गदर्शन केले. प्रारंभी ङ्गउद्योगाच्या घरी लक्ष्मी वास करीङ्घ ङ्गएकमेका साह्य करू: अवघे होऊ श्रीमंतङ्घ अशी कोटी करून, व्यवसायात प्रामाणिकपणा असला पाहिजे, कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. कुठलेही काम, कुठलीही संधी मिळाली की त्या संधीचे सोने करायचे. असा कानमंत्र उद्योजकांना दिला. मुख्यमंत्री असताना ज्या ज्या दुकाने, व्यवसायांची उद्घाटने केली. त्यांची व्यवसायात वृद्धी झाली. त्यामुळे खरं म्हणजे रॉयल्टी घ्यायला हवी होती. पण मी विदाऊट रॉयल्टी काम करणारा माणुस आहे. असे शिंदे यांनी स्पष्ट करताच टाळ्यांचा कडकडाट झाला. शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला. याची आठवण जागवताना ते काम फार कठीण होते, याची कबुली शिंदे यांनी देताना पूर्वीच्या सर्व बंद बंद करणाऱ्या लॉकडाऊन सरकारवर अनुल्लेखाने टिका केली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.